**"सडा- शोध आणि बोध" कार्यशाळा (१९ व २० ऑगस्ट २०२३ कशेळी)**

जांभा दगडाचे विस्तीर्ण पठार म्हणजे सडे. महाराष्ट्र राज्याच्या वैशिष्ट्यांमध्ये "सडे" या नैसर्गिक अधिवासाला मानाचे स्थान आहे. सह्याद्रीच्या माथ्यावरील आणि कोकणपटटीतील सड्यावर वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती आणि प्राणी समूह उत्क्रांत झाले आहेत. शेवाळे, लायकेन, सपुष्प वनस्पतींबरोबरच प्राण्यांचीही जैवविविधता सड्यांवर दिसते. यात अंदाजे १०० "प्रदेशनिष्ठ" प्रजातींची नोंद झाली आहे. पावसाळ्यात सडयावरील खळग्यांमध्ये पाणी साचून जलवनस्पती, देवभाताचे झुबके वाढतात. लाखो पिवळी, गुलाबी, निळी, पांढरी व जांभळी फुले फुलतात. हरतऱ्हेच्या माशा, मधमाशा, भुंगे, फुलपाखरे या फुलांना भेट देतात. सड्यावर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात कीटक भक्षी वनस्पती आढळतात. मासे, बेडूक,सापसुरळी, विंचु आणि इतर कीटक सड्याच्या भेगाभेगातून दिसतात. कोकणातील ढोकाचे फुल किंवा एकदांडी म्हणजेच *Dipcadi concanense*, आणि लिली प्रकारातील *Iphigenia ratnagirica* या सड्यावरील प्रदेशनिष्ठ वनस्पतींचा समावेश जागतिक स्तरावरच्या धोकाग्रस्त लाल यादीत (redlist) झाला आहे. Amboli toad (*Xanthophryne tigerina*), डोरले पाल (*Hemidactylus albofasciatus*) असे प्राणीही लाल यादीत नोंदले गेले आहेत. सडे जोवर टिकून राहतील तोवरच या प्रजाती सुरक्षित राहतील. कोकणातील मानवी संस्कृती ही सड्याच्या मातीमध्ये रुजलेली आहे.

Bombay Environmental Action Group (BEAG) या संस्थेला, द हॅबिटॅट ट्रस्ट या संस्थेकडून मिळालेल्या अनुदानातून जानेवारी २०२२ मध्ये कोकणातील सडा अधिवासाच्या जैविक आणि सांस्कृतिक वारशाच्या अभ्यासाचे काम डॉ. अपर्णा वाटवे यांच्या नेतृत्वाखाली चालू झाले. स्थानिक जाणकार, ग्रामपंचायती आणि स्थानिक निसर्गप्रेमी यांच्या सहाय्याने रत्नागिरीच्या सड्यांवरील जैवविविधता तसेच सांस्कृतिक माहिती आणि समाजजीवन यांची नोंद केली गेली. या अभ्यासाचा भाग म्हणून १९ व २० ऑगस्ट २०२३ रोजी कशेळी गावामध्ये "सडा- शोध आणि बोध" ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण २० हून अधिक संस्थांतील ६० अभ्यासकांनी भाग घेतला. कोकणातील "सडा" या अधिवासाचा आतापर्यंत लोक-सहभागातून झालेला अभ्यास व अभ्यासाची पुढील दिशा यावर चर्चा झाली.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात सह्याद्री निसर्ग मित्र संस्थेचे ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ भाऊ काटदरे; नवरोज मोदी (BEAG), सोनाली मेस्त्री ( पर्यावरण विभाग, मुंबई सबसेंटर रत्नागिरी), व नागेश दफ्तरदार (मानद वन्यजीव रक्षक सिंधुदुर्ग) यांच्या हस्ते "सडा- शोध आणि बोध" ही मार्गदर्शिका आणि सडा अधिवासावरील माहितीपर पोस्टरचे अनावरण झाले. सौ. पूर्वा जोशी, डॉ. अपर्णा वाटवे आणि मनाली राणे यांनी लिहीलेल्या या पुस्तिकेत सडा अधिवासाचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक माहिती कशी गोळा करावी याबद्दल मार्गदर्शन केले आहे. यानंतर अपर्णा वाटवे यांनी महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण सडा परिसंस्था त्याचे जैविक महत्त्व ह्याबद्दल विवेचन केले. रत्नागिरीच्या गोगटे-जोगळेकर महविद्यालायतील प्राध्यापक डॉ. सुरेन्द्र ठाकुरदेसाई यांनी कोकणातील सड्यांची उत्क्रांती व भू-वैशिष्ट्ये याबद्दल माहिती दिली. कशेळी गावातील रहिवासी या नात्याने सोनाली मेस्त्री यांनी स्थानिकांच्या जीवनात सडा परिसंस्थेचे महत्व यावर विचार मांडले. पूजा घाटे, आदित्य गडकरी, जिथीन विजयन आणि मनाली राणे या तरुण संशोधकांनी सडयावरील लोकसंस्कृती, वनस्पती, प्राणी आणि त्यात होत असलेले बदल याचा अभ्यास सादर केला.

दुपारच्या सत्रात कार्यशाळेत उपस्थित असलेल्या संस्था व अभ्यासक यांनी स्वतःच्या कामाची ओळख करून दिली आणि सड्यावर करत असलेल्या अभ्यासाची माहिती दिली. सहयाद्री संकल्प सोसायटीच्या प्रतिक मोरे यांनी देवरुख येथील सड्यावर चालू असलेले संशोधन, त्यातून गोळा झालेली माहिती लोकांपर्यंत पोचवण्यासाठी चालू केलेले उपक्रम, दीपकाडी फेस्टिवल यांबद्दल सांगितले. दिव्यांषु पवार यांनी सडयामधील पाणीसाठ्याचा अभ्यास सादर केला. सडयामधून वर्षभर पाणी पुरवठा कसा होतो हे नकाशाच्या माध्यमातून समजावून सांगितले. राजापूर तालुक्यातील अणसुरे गावाने केलेल्या जैवविविधता वेबसाईट बद्दल श्री हर्षद तुळपुळे यांनी मांडणी केली. शेवटच्या सत्रात BEAG च्या हेमा रमाणी यांनी महाबळेश्वर पांचगणी प्रादेशिक विकास योजनेमध्ये सडा संरक्षणासाठी शाश्वत विकासाचे नियोजन कसे केले गेले याची माहिती दिली. सातारा जिल्हयाच्या प्रादेशिक योजनेत सडा संरक्षण कसे केले याबद्दलही सांगितले. महा MTB च्या अक्षय मांडवकर यांनी कोंकणी दीपकाडीवर तयार केलेली चित्रफित दाखवून पहिल्या दिवसाची सांगता केली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूर्वा जोशी यांनी केले.

दुस-या दिवशी कार्यशाळेचा भाग म्हणून देवीहसोळ या गावाच्या सडयाला अभ्यास भेट आयोजित केली होती. श्री. आर्यादुर्गा मंदिर परिसर, तेथील कातळशिल्पे, जैवविविधता याबद्दल माहिती घेण्यासाठी ही क्षेत्रभेट होती. श्री. सुधीर रिसबूड यांनी या परिसरातील कातळशिल्पांची रचना समजावून सांगितली. श्री. सुहास गुर्जर व श्री. संतोष पाध्ये यांनी या परिसरातील सामाजिक उत्सव, येथील दैवते व प्राचीन मंदिराची माहिती दिली. यानंतर समारोपाच्या सत्रात कार्यशाळेत सहभागी झालेलया सा-यांनी सडयाच्या जैविक आणि सामाजिक पैलूंची नोंद करण्यासाठी सजग नागरिक व अभ्यासक म्हणून योगदान कसे देता येईल याबद्दल मते व्यक्त केली. "सडा- शोध आणि बोध" ही मार्गदर्शिका आणि पोस्टर सर्वांना दिले गेले.